जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, बुलढाणा- 443001

दुरध्वनी क्र. 07262-242307/242411

Email :- rdc_buldhana@rediffmail.com Website:- https://www.buldhana.nic.in

---

क्रमांक /गृहविभाग कक्ष4-2/कावि/ 1216 /2022 दिनांक - 21/09/2022

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1951 चे कलम 33 (1) (ख) तसेच**
**मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 115 अन्वये अधिसुचना**

*****

ज्याअर्थी पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांनी पत्र क्र.पोअबु/जिवानिश/चिखली शहर/वाह.नियमन/ 2022-35 दिनांक 04/02/2022 नुसार कळविले आहे की, बुलढाणा जिल्हयातील चिखली शहरातील वाढलेली लोकसंख्या तसेच वाढलेली वाहनांची संख्या व बाहेरून चिखली शहरात निर्माण होणारी नागरीकांची गर्दी व वाहतुकीची कोंडी यामुळे घडत असलेल्या किरकोळ व गंभीर स्वरूपाचे अपघातामुळे जनतेच्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. चिखली शहरातील जाफ्राबाद रोड, सिध्दसायन्स चौक ते जयस्तंभ चौक, बसवेश्वर चौक, बैलजोडी, सैलानी नगर ते जुना बुलढाणा रोड तसेच सिध्दसायन्स चौक ते शिवाजी पार्क, खामगांव चौफुली, मार्गा लगत वाढलेली नागरीवस्ती, शाळा, महाविद्यालये, दवाखाना व शासकीय कार्यालये तसेच सतत होणारे अपघात यामुळे नमुद मार्गावरील वाहतुक कमी करून नागरीकांच्या सुरशिक्षतते करीता मेहकर फाटा ते राऊतवाडी, शेलुद हायवे सुरू करण्यात आलेला आहे. परंतु शहरात जाणारी/येणारी मालवाहु जड व हलकी वाहने शिवाजी चौक बाजारपेठ, बाबु लॉज चौक, डी.पी.रोड व गावामध्ये गर्दीच्या वेळी वाहने आणतात. त्यामुळे नमुद मार्गावर वाहनांची वर्दळ होऊन किरकोळ व गंभीर स्वरूपाचे अपघात होतात, असे निदर्शनास आणुन दिलेले आहे.

आणि ज्याअर्थी चिखली शहरातील वाढलेली लोकसंख्या तसेच वाढलेली वाहनांची संख्या व बाहेरून चिखली शहरात निर्माण होणारी नागरीकांची गर्दी व सदर ठिकाणी वाहतुकीची कोंडी निर्माण होऊ नये तसेच वाहतुक सुरळीत व सुरक्षित पार पाडण्याच्या अनुषंगाने या कार्यालयाची प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करण्यात येऊन हरकती/आक्षेप मागविण्यात आले होते. त्यानुसार पोलीस स्टेशन चिखली येथे एकुन 19 हरकती प्राप्त झालेल्या आहेत. सदर हरकतीचा निपटारा करण्याकरीता उपविभागीय दंडाधिकारी बुलढाणा, पोलीस निरिक्षक, पो.स्टे. चिखली व मुख्याधिकारी, नगर परिषद, चिखली अशी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने त्यांचा अभिप्राय या कार्यालयास सादर केलेले आहे.

आक्षेपानुसार अक्षेपकर्ते यांचे म्हणणे एकुन घेऊन समितीने त्यांच्या म्हणन्यानुसार त्यांना पर्यायी व्यवस्था नगरपरिषद चिखली व पोलीस विभागाने समन्वयाने उपलब्ध करून देण्याबाबत सहमती दर्शविली आहे.

आणि ज्याअर्थी चिखली शहरातील सर्वसामान्य नागरीक, विद्यार्थी यांचे सुरक्षतते करीता तसेच शहरातील वाहतुक व्यवस्था सुरळीत व सुरक्षित ठेवुन अपघातास प्रतिबंध करण्या करीता मालाची वाहतुक करणाऱ्या हलके व जड वाहनांना चिखली शहरातील काही मार्गाने वेळेचे बंधन ठेवून वाहतुक करणाऱ्या वाहनांना वाहतुक करण्याची सुट देऊन मार्ग वाहतुकीस बंद करणेबाबत प्रस्तावित अधिसुचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी एस. रामामुर्ती, जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी बुलढाणा, महाराष्ट्र पोलीस कायदा 1951 चे कलम 33 (1) (ख) अन्वये तसेच मोटार वाहन कायदा 1988 चे कलम 115 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार बुलढाणा जिल्हयातील चिखली शहरातील नागरीकांचे सुरक्षिततेच्या

जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा (महा.) सत्यमेव जयते



Scanned with Oken Scanner

दृष्टीने चिखली शहरात अवागमन करणा-या सर्व मालवाहु जड व हलके वाहनांच्या (407,709,1109) वाहतुकीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करीत आहे.

**चिखली शहरातुन वाहतुक करण्यास प्रतिबंधीत मार्ग :-**

1. चिखली शहरात सर्व जड व हलकी मालवाहु वाहनांना (407, 709, 1109 जडवाहने) दररोज सकाळी 10.00 ते 18.00 वा. पर्यंत शहरामध्ये वाहतुकीस प्रवेश बंद राहील.
2. बाबु लॉज चौक ते महाराणा प्रताप पुतळयापर्यंत सर्व वाहनांना व रस्त्यावरील हातगाडीसाठी रस्त्याचे मध्ये बसणारे व हातगाडी ठेवणारे यांना मधोमध विक्रीस प्रतिबंध राहील.
3. हातगाडी, भाजी विक्रेते, हातगाडयांसाठी प्रतिबंध राहील व त्यांना पर्यायी जागा तात्पुरत्या स्वरूपात पारधी मठ येथे नगर परिषद व पोलीस विभाग यांनी उपलब्ध करून दयावी. तसेच बाबुलॉज चौक ते हिंदुसुर्य महाराणा प्रताप गेट व बस स्टँडचे आऊट गेट पार्कींगव्यवस्था ही ऑड ईव्हन नुसार करावी रस्त्याच्या मधोमध पार्कींग किंवा भाजी विक्रेते, फळ विक्रेते किंवा इतर यांना बसण्यास प्रतिबंध राहील. मुख्य रस्ता हा मध्यभागी सर्वसामान्य जनतेसाठी मोकळे राहतील. (दर सोमवारला होणार आठवडी बाजार हा दिवस तात्पुरता स्वरूपात वगळून)
4. जयस्तंभ चौक ते बसवेश्वर चौक दोन्ही बाजुने दुचाकी व चारचाकी वाहन वा हातगाडी पार्कींगसाठी मनाई प्रतिबंध राहील.
5. बसस्टँड पासुन दोन्ही बाजुस 200 मिटर अंतरा पर्यंत अवैद्य प्रवासी वाहनांना प्रतिबंध राहील.
6. ॲटो स्टॉप साठी चिखली बसस्टँड लगत असलेल्या मोकळया जागेत पार्कींग क्षेत्र करण्यात यावे.
7. ॲटो स्टॉप साठी शिवाजी चौक लगत असलेल्या मोळया जागेत पार्कींग क्षेत्र करण्यात यावे.
8. कृषी उत्पन्न बाजार समिती मध्ये अन्नधान्याची वाहतुक करणाऱ्या सर्व प्रकारचे वाहनांना विश्रामगृह चौक, भंगार गल्ली, जयस्तंभ चौक, कृषी उत्पन्न बाजार समितीचा मार्ग मोकळा राहील.
9. गिट्टी, बोल्डर, रेती, मुरूम, मलबा वाहतुक करणाऱ्या वाहनांना शहराचे बाहेरील रस्त्याने आत प्रवेश वेळ सकाळी 06.00 ते सकाळी 10.00 वा तसेच 18.00 वा. पुढे राहील.
10. छत्रपती शिवाजी महाराज चौका मध्ये 200 मिटर परीसरात चारचाकी, दुचाकी वाहने पार्कींग करण्यास प्रतिबंध राहील.
11. चिखली शहरात प्रवेश बंदी नंतर वाहतुक करणाऱ्या जडवाहनांना एन.एच. 146 वर रोडचे बाजुने किंवा MIDC तसेच मेहकर फाटयाच्या बाहेर किंवा शेलुद च्या मागे थांबता येईल यापुढे शहरात थांबता येणार नाही.
12. चिखली शहरातील अंतर्गत रस्त्यावर सकाळी 10.00 ते 18.00 वा पर्यंत कोणतेही जड व हलकी (407, 709, 1109 रेती-बोल्डर, रेती इत्यादी) वाहन उभे किंवा वाहतुक करता येणार नाही.
13. सर्व प्रकारची हलकी मालवाहु वाहनांना सकाळी 06.00 ते 10.00 ते 16.00 व 19.00 वा चे नंतर यावेळे दरम्यान चिखली शहरात वाहतुकीस परवानगी राहील. तसेच शहरातील अतंर्गत रस्त्यावर अस्ताव्यस्त वाहने उभे करण्यास मनाई राहील.
14. चिखली शहरात ज्या वाहनांना मालाची चढ-उतार करण्याची आवश्यकता नाही अशा सर्व प्रकारच्या जड वाहनांना 24 तास प्रवेश बंदी राहील. त्यांना फक्त हायवे रोडचा वापर करता येईल.
15. सदर अधिसुचने मधील वेळेचे बंधन सर्व जड व हलके (407, 709, 1109) वाहनांना रविवारी व शासकीय सुट्टीचे दिवशी लागु राहणार नाही परंतु रमजान ईद, गणपती उत्सव, नवदुर्गा उत्सव, दिपावली व इतर महत्वाचे सणाचे वेळी अधिसुचना लागु राहील.
16. सर्व प्रकारचे वाहनांना मोटार वाहन अधिनियम अनुसार वाजवी क्षमतेपेक्षा जास्त अधिभार (वजन) वाहुन नेता येणार नाही.
17. सदर अधिसुचना ही अत्यावश्यक सेवेतील ॲम्बुलन्स, फायर ब्रिगेड पोलीस, गॅस सिलेंडर ट्रक, पेट्रोल, डिझेल टँकर इत्यादी वाहनांना शहरात येण्यास व जाण्यास बंदी राहणार नाही. सदर अधिसुचना ही चिखली शहरातील सर्व ट्रक ट्रान्सपोर्ट व बाहेरील येणाऱ्या मालवाहु ट्रक, गिट्टी बोल्डर वाहनांना बंधनकारक राहील.



Scanned with Oken Scanner

18. यासाठी लागणारे दिशा निर्देशक बोर्ड हे मुख्याधिकारी नगर परिषद चिखली यांनी तातडीने लावावे.
19. अधिकृत ॲपेधारक/अधिकृत ऑटोधारक/अधिकृत जिपधारक यांना रहदारीस,वाहतुकीस अडथळा न होईल अशा ठिकाणी स्टँड करीता जागा नगरपरिषद व पोलीस विभागाने समन्वयाने उपलब्ध करुन द्यावी.
20. नोंदणीकृत हॉकर्स,फेरीवाले यांना पर्यायी जागा नगरपरिषद चिखली यांनी व्यवस्थीतरीत्या उपलब्ध करुन द्यावी.
21. औषधी,बी बियाणे, खते व इतर जिवनावश्यक वस्तुंचे मालवाहु वाहनांना विशिष्ट वेळेत प्रवेश देण्यात यावा.

सदर अधिसूचना दिनांक 21/09/2022 रोजी माझ्या सही व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(एस. रामामुर्ती)
**जिल्हादंडाधिकारी,बुलढाणा**

प्रतिलिपी :- 1. मा.विभागीय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहितीस्तव सादर.
2. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.बुलढाणा
3. पोलीस अधिक्षक, बुलढाणा.
4. उपविभागीय अधिकारी, बुलढाणा.
5. जिल्हा माहिती अधिकारी, बुलढाणा.
... सदर अधिसुचना वर्तमान पत्रामध्ये विनामुल्य प्रसिध्दी करण्यात यावी
6. तहसिलदार, चिखली.
7. मुख्याधिकारी, नगर परिषद, चिखली.
8. पोलीस निरिक्षक, पो.स्टे. चिखली.
9. आगार व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, चिखली.

**जिल्हादंडाधिकारी, बुलढाणा**



Scanned with Oken Scanner